पुस्तकाचे नाव - तान्ह्या लेकरांची जोगवण

लेखकाचे नाव - उपलब्ध नाही.

प्रकाशक - ख्रिश्चन लिटरेचर सोसायटी, जॉइंट स्टॉक प्रिंटींग प्रेस, मुंबई

प्रकाशन वर्ष - १८९२

किंमत - अर्धा आणा

पृष्ठसंख्या - २८

सारांश –

हे पुस्तक "The management of infants" या मूळ इंग्रजी पुस्तकाचे मराठी भाषांतर आहे परंतू भाषांतरकर्त्याचे नाव दिलेले नाही. त्याकाळी हिंदुस्थानात बालमृत्यूचे असलेले मोठे प्रमाण, त्याची कारणे व त्यावरील उपाय हा या पुस्तकाचा विषय आहे. पुस्तक मूळ ख्रिस्ती असल्याने बालमृत्यू टाळण्याकरिता एक उपाय म्हणून पुस्तकाच्या शेवटी येशूची प्रार्थना दिली आहे.

शीर्षकपानाची प्रतिकृती



देणगी दाखल सप्रेम भेट.

# तान्ह्या लेंकरांची जोगवण.

## उपोद्घात.

**मूल झाल्याचा आनंद.**—प्रपंच करूं लागल्यावर, स्त्री-पुरुषांस मातापिता असें अभिधान प्राप्त होतें, तो दिवस मोठ्या आनंदाचा होय. त्या दिवसापासून त्यांचें परस्परांचें प्रेम अधिकाधिक होत जातें; त्यांचे जीव अधिकाधिक एक होत जातात; त्यांस सुखप्राप्तीचा एक नवा मार्ग सांपडलासा होतो; आणि एक प्रकारचा नवा व्यवसाय त्यांच्यामागें लागतो.

**लहान मुलांचें मरण.**—मूल झाल्याबरोबर जो मोठा आनंद होतो, त्याच्या मागून लागलेंच त्याच्या मरणाचें दुःख कधीं कधीं प्राप्त होतें, ही गोष्ट फार वाईट आहे. कलकत्त्यांतल्या मुसलमान लोकांत जीं मुलें जन्मास येतात, त्यांतलीं अर्धीं मुलें एका वर्षाच्याआंत मरतात; आणि त्यांतलीं अर्धीं—ह्मणजे एकंदर मुलांतलीं चौथा हिस्सा मुलें जन्मल्यापासून पंधरा दिवसांच्याआंत मरतात, हें फारच आहे. पण एकंदरीनें सर्वत्रच मोठ्या माणसांपेक्षां मुलें पुष्कळ मरतात, ही गोष्ट खरी आहे. कलकत्त्यांतल्या ख्रिस्ती लोकांत एका वर्षाच्या वयाच्या आंतल्या मुलांत पांचांत एक मरतें, आणि इंग्लंडांत आठांत एक मरतें. वयाच्या दुसऱ्या वर्षांत मुलें थोडीं मरतात. आणखी ह्या मानानें तीं जसजशीं मोठीं होत जातात, तसतशीं त्यांच्यामध्यें माणसें